जिल्हा परिषद पालघर

# जाहिरात शुध्दीपत्रक क्रमांक:-१/२०१९

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत गट -क संवर्गातील अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा) रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात क्रमांक:-०१/२०१९ दिनांक ०३.०३.२०१९

## शुध्दीपत्रक

जिल्हा परिषद पालघर अंतर्गत उपरोक्त जाहिरातीमध्ये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील बांधकाम व पाणी पुरवठा विभागाची अनुक्रमे ७ व ५ अशी पदे भरती योग्य दर्शविण्यात आलेली आहेत. तथापि, सदरची पदे ही पदोन्नतीची असून जाहिरातीत चुकीने सरळसेवेची दर्शविण्यात आलेली आहेत.

उपरोक्त अनुषंगाने पालघर जिल्हा परिषदेमधील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील बांधकाम व पाणी पुरवठा विभागांची भरती योग्य पदांची पद संख्या ० (निरंक) आहे. याबाबत संबंधित उमेदवारांनी याची नोंद घेऊन उपरोक्त पदाकरिता नव्याने अर्ज सादर करण्यात येऊ नये. यापुर्वी ज्या उमेदवारांनी परिक्षा शुल्क भरणा केले आहे. त्यांना परिक्षा शुल्क परत करण्याबाबत कार्यवाही केली जाईल.

याबाबत उमेदवारांना झालेल्या तसदीबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे.

मिलिंद बोरीकर (भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

Scanned by CamScanner